RI17D101 दिनांक :- ०९/०१/२०२६
खाते कोड क्रमांक ३०

# पुणे महानगरपालिका

## चलन / पावती 16615

खात्याचे नाव : आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका

मालकाचे नाव : मे.ढोले पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी

पत्ता : पुणे

कामाचा तपशील : रक्कम ₹ ३,०००/-

मा.आरोग्य अधिकारी कार्या. ठराव क्र. १/८६४
दि.०२/०१/२०२६ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या
रुग्णालये/दवाखाने येथे प्रशिक्षणाकरिता परवानगी देणेबाबत.
दि.०१/०१/२०२६ ते दि.३१/०३/२०२६

एकूण ₹ ३,०००/-

एकूण रक्कम ₹ तीन हजार पाचशे रुपये/-

Malkar.D.K.
उप-आरोग्य अधिकारी/निरीक्षक
आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका

बँक ऑफ महाराष्ट्र,पुणे म.न.पा.शाखा,पुणे-5
Bank of Maharashtra, Pune P.M.C. Br.,Pune-5
9 JAN 2026
3
नक्द प्राप्त
CASH RECEIVED

वरीलप्रमाणे रोख / चेक / मनीऑर्डरने मिळाले.

पैसे मिळाल्याचा बँकेचा शिक्का

स्वाक्षरी :

दिनांक :

मुमादामु. ११५३ (५०X२ पानी १००० पुस्तके) १-१९ - स.सा. ११६

आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र :- HO/८२५७
दिनांक:- ०२/०१/२०२६

प्रति,

प्रिन्सिपल,

ढोले पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी,

पुणे ४१२२०७

विषय:-आपल्या संस्थेचे प्रशिक्षणार्थींना पुणे महानगरपालिकेच्या भारतरत्न स्व.राजीव गांधी रुग्णालय,येरवडा येथे फिजिओथेरपी प्रशिक्षणासाठी परवानगी देणेबाबत.

संदर्भ:- मा.आरोग्य अधिकारी, पुणे महानगरपालिका यांची मान्यता ठराव क्र.१/८६४ ,दि. ०२/०१/२०२६

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित ठरावान्वये, ढोले पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, पुणे यांचे प्रशिक्षणार्थींना पुणे महानगरपालिकेच्या भारतरत्न स्व.राजीव गांधी रुग्णालय,येरवडा पुणे रुग्णालयामध्ये प्रशिक्षणाकरिता खाली नमूद अटींवर मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | रुग्णालय व प्रशिक्षण वर्ग | कालावधी | | प्रशिक्षणार्थी संख्या | प्रती प्रशिक्षणार्थी प्रती महिना र.रु. | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| भारतरत्न स्व.राजीव गांधी रुग्णालय,येरवडा | | | | | | |
| १. | तृतीय वर्ष B.P.Th | दि.०१/०१/२०२६ ते दि.३१/०३/२०२६ | ३ महिने | ०१ | २५०/- | ७५०/- |
| २. | चतुर्थ वर्ष B.P.Th | | | ०२ | २५०/- | १,५००/- |
| ३. | इंटर्न | | | ०१ | २५०/- | ७५०/- |
| | एकूण | | | | | ३,०००/- |

**<u>नोट – एकूण रक्कम रु. ३,०००/- (अक्षरी तीन हजार रुपये फक्त) इतके शुल्क सदर संस्थेकडून आकारण्यात येईल.</u>**

१. मा. मुख्य सभा, पुणे महानगरपालिका यांचे ठराव क्र.४६७,दि.२०/०१/२००९ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या दवाखाना, रुग्णालय इ. ठिकाणी प्रशिक्षणाकरिता येणाऱ्या विद्यार्थांसाठी दरमहा प्रत्येकीरु.२५०/-इतके प्रशिक्षण शुल्क आकारण्यात येईल. त्यानुसार ढोले पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, पुणे यांचेकडील प्रशिक्षणार्थींसाठी वर नमूद केल्या प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.

२. प्रशिक्षणादरम्यान महानगरपालिका रूग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी व इतर संवर्गातील कर्मचाऱ्यांना त्यांचे दैनंदिन कामकाजामध्ये अडचण निर्माण होणार नाही याबाबत संबंधित संस्थेकडील प्रशिक्षणार्थी व शिक्षकांनी दक्षता घ्यावी.

३. फिजिओथेरपी विभागात, प्रशिक्षणा दरम्यान रुग्णसेवेस अत्यावश्यक असणारे साहित्य संस्थेने आणावे.तसेच सदर साहित्याची देखभाल व दुरुस्ती संबंधित संस्थेमार्फतच करण्यात यावी.महानगरपालिका रुग्णालयाकडून कोणत्याही प्रकारचे साहित्य व यंत्र सामुग्री पुरविण्यात येणार नाही.

४. मे.महाराष्ट्र शासन, पुणे महानगरपालिका आरोग्य विभाग यांचेकडून वेळोवेळी जाहीर केलेल्या आरोग्या संबंधित कार्यक्रमात फिजिओथेरपी विभाग प्रमुख यांनी नेमून दिलेल्या संस्थेला सहभाग घेणे बंधनकारक राहील.

५. उपरोक्त नमूद संस्थेतील विद्यार्थी विहित कालावधीत गैरहजर असल्यास, गैरहजर कालावधीचे एक्सटेन्शन,फिजिओथेरपीविभाग प्रमुख यांनी नेमून दिलेल्या रुग्णालयातच पुर्ण करणे बंधनकारक राहील.तसेच पुणे महानगरपालिका आरोग्य विभागांतर्गत विविध रुग्णालयांकडील रुग्ण संख्या लक्षात घेता इंटर्न/एम.पी.टी.यांना आवश्यकतेनुसार इतर रुग्णालयात भौतिकोपचाराची वैद्यकीय सुविधा देणेसाठी पाठवण्यात येईल.

६. अत्यावश्यक सेवेअंतर्गत पुणे महानगरपालिका रुग्णालयांसाठी प्रतिवर्षी निश्चित केलेल्या सार्वजनिक सुट्ट्या इंटर्न व एम.पी.टी. यांना लागू राहतील. संबंधित संस्था प्रशासनाकडील सुट्ट्या लागू राहणार नाहीत.

७. सर्व इंटर्न यांनी महानगरपालिका रुग्णालयातील बाहयरुग्ण विभागाचे वेळेत म्हणजेच सकाळी ०९.००ते सायंकाळी०५.०० या निश्चित कालावधीसाठी उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

८. सर्व तृतीय व चतुर्थ वर्षातील विद्यार्थी आणि एम.पी.टी. यांनी महानगरपालिका रुग्णालयातील बाहयरुग्ण विभागात सकाळी०९.०० ते दुपारी ०१.०० या निश्चित वेळेत उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

९. पुणे महानगरपालिका रुग्णालयात सदर संस्थांना परीक्षा घ्यावयाची असल्यास व तपासणी (MUHS /OTPT/NAAC Inspection) करावयाची असल्यास सदरबाबत पूर्वसूचना देणे गरजेचे आहे. सदर पूर्वसूचना परीक्षा घेणेसाठी सात दिवस अगोदर आणि तपासणी (MUHS / OTPT / NAAC Inspection) करणेसाठी दोन दिवस अगोदर लेखी स्वरुपात सादर करणे आवश्यक राहील. सदरबाबत अंतिम निर्णय घेणेची कार्यवाही फिजिओथेरपी विभाग प्रमुखांच्या अखत्यारीत राहील.

१०.महानगरपालिका रुग्णालयातील फिजिओथेरपी विभागाचे व्यवस्थापन व त्या अनुषंगाने विविध परवानगी मिळणेकामी संबंधित रुग्णालयातील फिजिओथेरपी विभाग प्रमुखांशी संपर्क साधावा.

११.महानगरपालिका रुग्णालयात रुग्णसेवा बाधित होईल अशा वर्तनामुळे अत्यावश्यक नियमांचे उल्लंघन झाल्यास, संबंधित संस्थेस पूर्वसूचना न देता, देण्यात आलेली निश्चित परवानगी रद्द करण्यात येईल.

१२. संस्थेमार्फत ठरवलेल्या अपेक्षित संख्येने महानगरपालिका रुग्णालयातील भौतिकोपचार विभागात प्रशिक्षणार्थींना दाखल करून घेणे प्रत्येक वेळेस शक्य होणार नाही. फिजिओथेरपी विभाग प्रमुख यांनी गरजेनुसार निश्चित केलेल्या संख्येनुसारच प्रशिक्षणार्थी घेता येतील.

१३.महानगरपालिका रुग्णालयात वैद्यकीय सुविधा घेणेसाठी आलेल्या रुग्णांना, प्रशिक्षणा दरम्यान, उपचारातील हलगर्जीपणामुळे कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता प्रशिक्षणार्थींनी घ्यावी. याबाबत संबंधित संस्थेकडील शिक्षकांनी प्रशिक्षणार्थींवर जबाबदारीपूर्वक नियंत्रण ठेवणे आवश्यक राहील.

१४.पुणे महानगरपालिका रुग्णालयात, आरोग्य विभागामार्फत संस्थेकडील प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण,परिक्षा इत्यादींसाठी परवानगी मिळाल्यावर,सदर प्रतिची छायांकित प्रत संबंधित रुग्णालयातील भौतिकोपचार विभागात सादर करणे आवश्यक राहील.

उपरोक्त सर्व अटींचे पालन करणे आपले संस्थेस बंधनकारक आहे.

कळावे.

2/11/26

(डॉ.कल्पना बळीवंत)
प्र.आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

प्रत:- इंचार्ज वैद्यकीय अधिकारी,
भारतरत्न स्व.राजीव गांधी रुग्णालय,येरवडा
पुणे महानगरपालिका